कविता शिक्षणाची

हेरंब कुलकर्णी
herambrk@rediffmail.com

पोरांचा खेळ...

पोरांचा खेळ...
पंतप्रधान विचारतात
तुला कोणता खेळ येतो
पोरगं सांगतं मला फक्त धावता येतं
यावरची पंतप्रधानांची प्रतिक्रिया
पेपरात छापून नाही आली
फक्त जीपमध्ये पाळी केली आदिवासी पोराची
एवढ्यानेच त्यांची प्रतिमा म्हणे खूप उजळ झाली...
धावणं पोराच्या रक्तात आहे आणि लादलेल्या नशिबात
पोराचा आजही धावायचा संध्याकाळच्या उदरभरणासाठी
सशाच्या मागे तिरकमठा घेऊन दिवसभर यज्ञकर्म समजून
लंगोटी जाईपर्यंत घामाने भिजून
पोराचा बापही धावधाव धावायचा जंगलात
जमीनदाराच्या वावरातील गहू
कापून आणल्याचा आरोप त्याच्यावर असल्याने
पोलिस मागे लागते म्हणून
पोराची आईही धावत धावायची
तिच्या बेवारस छातीवर गोचांपासून काळ्यांपर्यंत
साऱ्यांची नजर असायची म्हणून आता
पोरगं फक्त धावतयं... ज्याला ते खेळ समजतंय
त्याच्या भाबड्या बोलानं ते एक दिवसापुरतं
तमाम वर्तमानपत्रात अमर झालयं
काय हो पण त्याचं नाव कुठं छापून आलयं
अहो नावात काय आहे त्याला ना नाव ना गाव
ना काम ना धाम त्याच्या आयुष्यात
आरामच आराम मनसोक्त धावावे थकावे
थकल्यावर झोपावे जागल्यावर पुन्हा धावावे
त्याचे नागरिक म्हणून कर्तव्य एवढेच की
चाळीस वर्षांनंतर पुन्हा पंतप्रधानांची जीप येईल
तेव्हा पोराच्या पोराने पुन्हा
याच खेळाचे नावं सांगावे....

नारायण कुलकर्णी कवठेकर (हे प्रसिद्ध कवी आहेत)

शाळांमध्ये खेळाला प्रोत्साहन दिले जाते. समाजात शासनात खेळाला प्रोत्साहन देण्याची चर्चा होते. ऑलिम्पिकमध्ये भारताला पदक का मिळत नाही याचेही परिसंवाद होतात, पण कवी याच धावण्याचे रूपक असे काही उलगडून दाखवितो की प्रस्थापित व्यवस्थेलाही धावण्याची कविता वाचता-वाचता थेट पळताभुई थोडी होते... कवीने अगदी बातमी वजा घटनेचे रूपक घेऊनआदिवासी मुलाची संपूर्ण कर्मकहाणी उलगडली आहे. ज्या धावण्याला आम्ही व्यायाम जॉगिंग असे शब्द देऊन प्रतिष्ठा दिली... ज्या धावण्याला आम्ही खेळात राष्ट्रीय अस्मितेचा विषय बनविला. ज्या धावण्याच्या मॅरेथॉन स्पर्धेला आम्ही सामाजिक कार्याचे मोठेपण दिले... पी. टी. उषाच्या पदकानंतर गेली २ दशके तरी धावणे म्हणजे ऑलिम्पिक राष्ट्रीय अस्मिता असे समीकरण आम्ही केले त्या देशात हा आदिवासी मुलगा आणि त्याच्यामागच्या पिढ्या शतकानुशतके धावतच आहेत, पण ते धावताहेत ऑलिम्पिकसाठी नाहीतर प्रत्यक्षात जगण्यासाठी. ते धावताहेत स्वतःच्या अब्रूसाठी जगण्याचा बचाव करण्यासाठी...

तेव्हा धावण्यातला भारत आणि इंडिया स्पष्ट करणारी ही कविता आहे... आम्ही कॅलरी जळण्यासाठी धावतो आणि आदिवासी पोटाची आग विझवायला धावतो आहे.

ही कविता शैक्षणिक या अर्थाने आहे की खेळ हा शब्द आपण किती सहजपणे उच्चारतो... जेव्हा आदिवासींचा विषय निघतो तेव्हा आम्ही लगेच म्हणतो की आदिवासी धावण्यात नेमबाजीत तरबेज असतात त्यांच्यासाठी क्रीडाप्रबोधिनी उभारा आणि तशी मागणी करून आदिवासी मुलांना करिअर उपलब्ध केल्याचे समाधान आम्ही मिळवतो. आमच्यासारखे लोकशिक्षणावर लिहिताना आदिवासी मुलांमधील या क्षमतांना पुढे न्यायला हवे असे म्हणत राहतो, परंतु या क्षमता त्यांच्यात कशा विकसित झाल्या याची काळी कहाणी ही कविता सांगते... त्यांच्यातल्या आज देशाला ऑलिम्पिक मेडल मिळवून देण्याच्या क्षमता हे व्यवस्थेने केलेल्या शोषणातून आले आहे, याचा अर्थ या मुलांना खेळाडू करू नये, असे नाही पण आम्ही केवळ या मुलांना प्रोत्साहन दिले की काम संपले असे सोपे उत्तर शोधतो. आदिवासींना शिकारीसाठी पोटात काहीतरी टाकण्यासाठी शेतात घुसण्याची वेळच येणार नाही, असे चांगले जीवनमान आपण देऊ शकू का...महिलांना अब्रू वाचविण्यासाठी पळावे लागणार नाही, अशी सुरक्षा देऊ शकू का... हे करणार असू तरच त्यांच्या मुलांच्या खेळाला प्रोत्साहन देण्याच्या उदात्तीकरणात अर्थ आहे.

आशेचा किरण

करिअर

विलास गावरसकर
vilasgavraskar@yahoo.co.in





मिळालेले गुण आणि खरी अंगभूत गुणवत्ता यांचा संबंध फारसा नसला तरीसुद्धा जगण्यासाठी आपल्याला 'मार्क्सवादी' होण्याशिवाय पर्याय नाही. म्हणजेच ज्याला जास्त मार्क्स मिळाले तो पुढे जाणार हे पटत नसलं तरी सत्य मान्य करावेच लागेल. ज्या विद्यार्थ्यांना दुर्दैवानं कमी मार्क मिळालेत त्याची अवस्था मात्र फारच वाईट होते. ना मनासारख्या कोर्सला ॲडमिशन घेता येतं ना आवडीचं कॉलेज आणि वर इतरांकडून होणारी मानसिक अवहेलना वेगळीच. अशा कमी गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांना सुद्धा आशेचा किरण निश्चितच आहे. त्यांनी अजिबात निराश न होता पुन्हा जोमाने तयारीला लागयचं. परीक्षेच्या काळातील चुकांचा फेरविचार करून, आत्मपरीक्षण करून, थोडेसे तंत्र बदलून पुन्हा तयारी करावी. हताश किंवा निराश होऊन वेळ वाया घालवण्यात अर्थ नाही. कारण आता वेळ आपण बदलू शकत नाही, पण वेळेवर प्रयत्न निश्चितच करू शकतो. बहुतेक विद्यार्थी पुन्हा रिपीट करण्याचाही विचार करतात. म्हणजे वर्षभर गॅप घेऊन मार्क वाढविण्यासाठी पुन्हा परीक्षा देतात. असं करायलाही हरकत नाही पण संभाव्य काही त्रुटींचा, शिक्षण पद्धतीतील दोषांचा, प्रश्नपत्रिकांतील चुका, शिक्षकांच्या संपामुळे निकालाची दिरंगाई, कॉपी प्रकरणामुळे फेरपरीक्षा यासारख्या गोष्टी बरोबरच स्वतःमध्ये आकलन क्षमता, अभ्यासाची सुद्धा शारीरिक, मानसिक अपेक्षा यांचा विचार केला जावा. आता ज्यांना तुलनेने कमी मार्क मिळालेत आणि पारंपरिक चाकोरीतील महाविद्यालयामध्ये प्रवेशाविषयी साशंकता आहे अशा गुणी विद्यार्थ्यांसाठी पर्याय उपलब्ध आहेतच. भारत सरकारच्या उद्योग मंत्रालयाच्या तंत्रज्ञान विकास केंद्रामार्फत अर्धवेळ काही डिप्लोमा कोर्सेस चालवले जातात. चार वर्षांच्या कालावधीचे हे कोर्सेस एआयसीटीई प्रमाणित आहेत. डिप्लोमा इन टूल अँड डायमेकिंग आणि डिप्लोमा इन ॲनिमेशन इन ग्राफिक्स असे हे कोर्स असून दहावीमध्ये कमीत कामी ५५ टक्के गुणांची पात्रता आवश्यक आहे. एससी, एस.टी. अशा राखीव जागांकरिता हीच अट ४५ टक्क्यांची आहे. चार वर्षांच्या या कोर्सची फी प्रतिवर्षी ४० हजार रु. एवढी असून हे अत्यंत उपयुक्त कोर्सेस आहेत. पुन्हा नोकरीच्या देखील संधी उपलब्ध आहेत. मात्र येथे प्रवेश घेण्याआधी एक सामायिक प्रवेश परीक्षा उत्तीर्ण होणे गरजेचे आहे. तेव्हा तुलनेने कमी गुण मिळालेल्या किंवा अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी नाउमेद न होता स्वतःमधील गुणांच्या कौशल्यांचा योग्य वापर करून अधिक मेहनतीने आणि चिकाटीने स्वतःला सिद्ध करण्याचा प्रयत्न करावा. इथे हुशारीचा कस लागू शकतो.

युवकांसाठी नवदृष्टीचे 'निर्माण'

समाजजाणिवा

वंदना धनेश्वर
vandana.dhaneshwar@gmail.com

उच्च शिक्षणानंतर गलेलठ्ठ पगाराची नोकरी म्हणजे करिअर नाही. ज्या समाजात आपण वावरतो त्या समाजाचं आपण काहीतरी देणं लागतो, याचं आजच्या तरुणाईला बहुदा विस्मरण झालं आहे. करिअर घडवताना समाजातल्या इतर गोष्टींकडे वेळ द्यायला तरुण पिढीकडे वेळच नाही. कित्येक वर्षे नोकरी करून, भरपूर पैसा कमावल्यानंतरही अनेकजण समाधानी दिसत नाहीत. मात्र ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय आणि डॉ. राणी बंग यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या 'निर्माण'च्या माध्यमातून ही अस्वस्थता दूर करण्याची संधी तरुण-तरुणींना मिळाली आहे.

मूळ औरंगाबादचा असलेला डॉ. विठ्ठल साळवे. २०११ ला वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर तो निर्माण च्या संपर्कात आला. आयुष्याकडे पाहण्याची नवी दृष्टी निर्माणमुळे मिळाली, असं त्याला वाटतं. म्हणूनच गडचिरोलीपासून चार किलोमीटरवरील दुर्गम भागात सेवा देण्याचा त्याने निर्णय घेतला. समविचारी पत्नीचाही पाठिंबा मिळाल्याने सध्या साळवे दांपत्य दुर्गम भागात आरोग्य सेवा देत आहे.

कधी कर्तव्य, तर कधी जबाबदारी, तर कधी गरज म्हणून शिक्षण, नोकरीच्या चक्राला प्रत्येक तरुण बांधला गेला आहे. व्यावहारिक पातळीवर ते कदाचित योग्यही असेल, पण या चक्रामुळे आयुष्य 'अर्थ'पूर्ण होतं, पण परिपूर्ण नाही. भौतिक सुखं मिळतात, पण समाधान नाही. समृद्धी येते पण स्वस्थता कायमची गमवावी लागते. आणि याची जाणीव अनेक तरुणांना बेचैन करते. काहीजण या अस्वस्थतेतच मागील पानावरून पुढे सुरू ठेवतात तर काही जण नवी वाट शोधण्यासाठी धडपडतात. शासकीय योजना मागास भागापर्यंत पोहोचवणारा गोपाळ महाजन, आकाश बडवे, ग्रामीण भागात विज्ञान-तंत्रज्ञान पोहोचवणारा नाशिकचा मयूर सरोदे, यवतमाळची कल्याणी वानखेडे, गरजूंना आरोग्य सेवा देणारा परभणीचा डॉ. गजानन फुटके, औरंगाबादचा डॉ. शिवप्रसाद थोरवे, या आणि यासारख्या अनेक धडपडी मंडळींची टीम निर्माणच्या माध्यमातून, राज्यातल्या दुर्गम भागात स्वतःचं कौशल्य वापरून उज्ज्वल समाज घडवण्यासाठी निःस्वार्थ सेवा देत आहे.

निर्माणची सुरुवात : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ. अभय आणि राणी बंग यांच्या पुढाकाराने २००६ मध्ये निर्माणची सुरुवात झाली. नंतर अनिल अवचट, विवेक सावंत सारखी मंडळीही या उपक्रमाशी जोडली गेली. निर्माण ही युवकांमधल्या नेतृत्वगुणांना दिशा देणारी, सामाजिक भान जागवणारी शिक्षण प्रक्रिया आहे. युवकांना सामाजिक समस्यांची जाणीव व्हावी, त्यावर उपाय शोधण्यासाठी त्यांनी एकत्र यावं, या प्रक्रियेमधून त्यांनी स्वतःचा शोध घ्यावा. त्यांना जगण्याचं ध्येय सापडावं, या उद्देशाने निर्माणची सुरुवात झाली. निर्माणच्या माध्यमातून राज्याच्या ३० हून अधिक जिल्ह्यातील दुर्गम, मागास भागांमध्ये आजच्या घडीला अनेक डॉक्टर्स, इंजिनिअर्स, वकील, शिक्षक, वाणिज्य-विज्ञान-कला शाखेचे विद्यार्थी, आरोग्य, शिक्षण आणि इतर मूलभूत समस्यांवर काम करताहेत. लोकांमध्ये मिसळून त्यांना अपेक्षित असलेले बदल घडवत आहेत.

निर्माणची कार्यपद्धती : सकारात्मक बदल घडवण्याची तीव्र इच्छा असणाऱ्यांना कौशल्य, पोषक वातावरण मिळवून देण्यासाठी निर्माणतर्फे काम केलं जातं. या प्रक्रियेअंतर्गत, तीन शिबिरांची एक मालिका तयार करण्यात आली आहे. वर्षातले एकूण २४ दिवस, तीन टप्प्यांत विभागून शोधग्राम सर्च, गडचिरोली इथं हे शिबिर भरवलं जातं. यात दुर्गम भागातील आरोग्य, शिक्षणाशी संबंधित विविध समस्या, मागास लोकांचा जीवनस्तर उंचावण्यात येणाऱ्या अडचणींवर चर्चा केली जाते. हे अडथळे कसे पार करता येतील याचा अभ्यास केला जातो. यासाठी प्रत्यक्ष काम करणाऱ्या लोकांसमवेत संवाद साधला जातो. शिवाय सहभागी विद्यार्थ्यांच्या विचार, भावनांची व्यापकता वाढवण्याच्या दृष्टीनं, तज्ज्ञांचं मार्गदर्शन, गटचर्चा, अनुभवाधारित स्वयंशिक्षणावरही शिबिरात भर दिला जातो. राज्याच्या विविध भागांतील अनेक उच्चशिक्षित युवकांनी इथून प्रशिक्षण घेतलं आहे.

स्वतः पलीकडच्या जगासाठी काहीतरी करण्याची तळमळ असणारे, करिअर करताना समाजसेवा किंवा समाजसेवा हेच करिअर बनवू इच्छिणारे, आपल्यातल्या कौशल्याचा, क्षमतेचा समाजासाठी उपयोग करू इच्छिणारे, आणि मुख्य म्हणजे स्वतःहून पुढाकार घेतल्याशिवाय व्यवस्था बदलणार नाही यावर ठाम विश्वास असणाऱ्यांसाठी निर्माण ही एक सुवर्ण संधी आहे. तुम्हालाही यात सहभागी व्हायचं असेल तर १५ ऑगस्टपर्यंत, http://nirman.mkcl.org या संकेतस्थळावर किंवा nirmaanites@gmail.com या मेल आयडीवर अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.

काय म्हणतात प्रशिक्षणार्थी...

व्यवस्थेला नावं ठेवण्यापेक्षा त्यातले कच्चे दुवे शोधून काम कसं करता येईल हे निर्माणमुळे शोधता आलं.
अमृता ढगे, अंबरनाथ

जगायचं कशासाठी या प्रश्नाचं उत्तर निर्माण मध्ये आत्यावरच मिळालं.
डॉ. मुकुंद जाधव, सांगली

बहुतेक सामाजिक समस्या परस्परांशी जोडलेल्या असतात आणि त्यांची उत्तरही. त्या सोडवताना त्यातला दुवा शोधण्याची दृष्टी निर्माणने दिली.
मुक्ता नावरेकर, नाशिक

शिष्यवृत्ती, स्पर्धापरीक्षा, अभ्यासक्रम

द. वा. आंबुलकर
dattatraya.ambulkar@gmail.com

शैक्षणिक साप्ताहिकी

• २४ जुलै : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, शिलॉंग येथील व्यवस्थापन विषयातील विशेष अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज करण्याची शेवटची तारीख. संपर्क : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, मयूरगंज कॉम्प्लेक्स, शिलॉंग- ७९३०१४. संकेतस्थळ : www.iimshilong.in

• २५ जुलै : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ प्लॅंट हेल्थ मॅनेजमेंट, हैदराबाद येथील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमासाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख. संपर्क : रजिस्ट्रार, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ प्लॅंट हेल्थ मॅनेजमेंट, राजेंद्रनगर, हैदराबाद- ५०००३०. दूरध्वनी : ०४०२४०११६३३. संकेतस्थळ : http://niphm.gov.in

• २५ जुलै : बाबासाहेब भीमराव आंबेडकर विद्यापीठ, लखनऊ येथील विविध अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज करण्याची शेवटची तारीख. संपर्क : बाबासाहेब भीमराव आंबेडकर युनिव्हर्सिटी, विद्या-विहार, रायबरेली रोड, लखनऊ - २२६०२५. संकेतस्थळ : www.bbau.ac.in

• २५ जुलै : नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, दुर्गापूर येथील संशोधनपर पीएचडीसाठी नोंदणी करण्याची शेवटची तारीख. संपर्क - डीन (रिसर्च ॲण्ड कन्सल्टन्सी), नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, म. गांधी ॲव्हेन्यू, दुर्गापूर ७१३२०९. दूरध्वनी ०३४३-२५४५२९०. संकेतस्थळ : www.nitdgp.ac.in

• २५ जुलै : होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूट, मुंबई येथील संशोधनपर पीएचडीसाठी नोंदणी करण्याची शेवटची तारीख. ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर, ३ होमी भाभा नॅशनल इन्स्टिट्यूट, ट्रेनिंग स्कूल कॉम्प्लेक्स, अणुशक्तीनगर, मुंबई-४०००९४. संकेतस्थळ : www.hbni.ac.in

• २५ जुलै : कामायनी प्रशिक्षण महाविद्यालय, पुणे येथील डीएड इन स्पेशल एज्युकेशन (मेंटली रिटार्डेशन) या अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज करण्याची शेवटची तारीख. संपर्क : कामायनी प्रशिक्षण महाविद्यालय, २७०/बी, गोखलेनगर, पुणे- ४११०१६. दूरध्वनी : ०२०-५६५१५८८. संकेतस्थळ : www.kamayanischool.org.

• २६ जुलै : इंडियन स्कूल ऑफ माइन्स, धनबाद येथील संशोधनपर फेलोशिपसाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख. संपर्क - रजिस्ट्रार, इंडिया स्कूल ऑफ माइन्स, धनबाद- ८२६००४.

• ३० जुलै : नॅशनल लॉ स्कूल, युनिव्हर्सिटी, बंगळुरू येथील कायदा विषयांतर्गत विविध पदविका अभ्यासक्रमांसाठी प्रवेश अर्ज करण्याची शेवटची तारीख. संपर्क - रजिस्ट्रार, नॅशनल लॉ स्कूल युनिव्हर्सिटी, नागरभावी, बंगळुरू - ५६०२४२. दूरध्वनी : ०८०-२३२१३१६०. संकेतस्थळ : http://ded.nls.ac.in

नॅशनल लॉ स्कूलचे विविध पदव्युत्तर अभ्यासक्रम

नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी, बंगळुरू येथे उपलब्ध असणाऱ्या विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये खाली नमूद केल्याप्रमाणे प्रवेश उपलब्ध आहेत.

उपलब्ध अभ्यासक्रमांचा तपशील :
१ पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम : दोन वर्षे कालावधीचा बिझनेस लॉ विषयातील पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम.
२ एक वर्ष कालावधीचे विविध पदविका अभ्यासक्रमः
• मानवी हक्क विषयातील पदविका अभ्यासक्रम.
• वैद्यकविषयक कायद्यातील पदविका अभ्यासक्रम.
• पर्यावरणविषयक कायद्यातील पदविका अभ्यासक्रम.
• बालहक्कविषयक कायद्यातील पदविका अभ्यासक्रम.
• ग्राहक हित संरक्षणविषयक कायद्यातील पदविका अभ्यासक्रम.
• संगणक व माहिती तंत्रज्ञान विषयातील कायद्यातील पदविका अभ्यासक्रम.

आवश्यक शैक्षणिक पात्रता : वरील सर्व अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्यासाठी अर्जदारांनी कुठल्याही विषयातील पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

विशेष सूचना : वरील अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेण्यासाठी महत्तम वयाची अट नाही.

अर्ज व माहितीपत्रक : अर्ज व माहितीपत्रक घरपोच हवे असल्यास १५०० रु.चा रजिस्ट्रार एनएलएसआययू. यांच्या नावे असणारा डिमांड ड्राफ्ट विनंती अर्जासह संस्थेच्या कार्यालयात पाठवावा.

अधिक माहिती व तपशील : अभ्यासक्रमांच्या संदर्भात अधिक माहिती व तपशिलासाठी नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडियाच्या दूरध्वनी क्र. ०८०-२३२१३१६० वर संपर्क साधावा अथवा लॉ स्कूलच्या http://ded.nls.ac.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.



अर्ज पाठविण्याचा पत्ता व शेवटची तारीख : विहित नमुन्यातील संपूर्णपणे भरलेले व आवश्यक तो तपशील आणि कागदपत्रांसह असणारे प्रवेश अर्ज रजिस्ट्रार, नॅशनल लॉ स्कूल ऑफ इंडिया युनिव्हर्सिटी, नागरभावी, बंगळुरू- ५६०२४२ या पत्त्यावर ३० जुलै २०१४ पर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

नॅशनल पॉवर ट्रेनिंग इन्स्टिट्यूटचे विशेष अभ्यासक्रम

नॅशनल पॉवर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, नवी दिल्ली येथे उपलब्ध असणाऱ्या खालील पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश उपलब्ध आहेत-

• **थर्मल पॉवर प्लॅंट इंजिनिअरिंगमधील पदव्युत्तर अभ्यासक्रम :** अर्जदारांनी मेकॅनिकल वा इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगमधील पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेली असावी.

• **पॉवर ट्रान्समिशन ॲण्ड डिस्ट्रीब्युशन विषयातील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रम :** उमेदवारांनी इलेक्ट्रिकल, पॉवर, इलेक्ट्रिकल वा इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंगमधील पदवी परीक्षा उत्तीर्ण केलेली असावी.

• **निवड पद्धती :** अर्जदारांची संबंधित पात्रता परीक्षेतील गुणांच्या टक्केवारीच्या आधारे त्यांना समूहचर्चेसाठी बोलाविण्यात येऊन त्यानुसार संबंधित अभ्यासक्रमात प्रवेश देण्यात येईल. निवड झालेल्या उमेदवारांना इन्स्टिट्यूटतर्फे वसतिगृहाची सोय उपलब्ध करून दिली जाईल.

• **अर्ज व माहितीपत्रक :** अर्ज व माहितीपत्रक घरपोच हवे असल्यास ८०० रु.चा एनपीटीआय, बद्रपूरच्या नावे असणारा व नवी दिल्ली येथे देय असणारा डिमांड ड्राफ्ट विनंती अर्जासह इन्स्टिट्यूटच्या कार्यालयात पाठवावा.

• **अधिक माहिती व तपशिलासाठी संपर्क :** अभ्यासक्रमांच्या संदर्भात अधिक माहिती व तपशिलासाठी नॅशनल पॉवर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, नवी दिल्लीच्या दूरध्वनी क्र. ०११-२६९४०७२२ वर संपर्क साधावा अथवा इन्स्टिट्यूटच्या www.upti.in या संकेतस्थळाला भेट द्यावी.

• **अर्ज पाठविण्याचा पत्ता व शेवटची तारीख :** संपूर्णपणे भरलेले प्रवेशअर्ज दि प्रिंसिपल डायरेक्टर, नॅशनल पॉवर ट्रेनिंग इन्स्टिट्यूट, बद्रपूर, नवी दिल्ली ११००४४ या पत्त्यावर पाठविण्याची शेवटची तारीख ८ ऑगस्ट २०१४.

एज्यु कॉर्नर

स्मिता केळकर
smit.kelkar@gmail.com

गरज घोकंपट्टीच्या चौकटीतून बाहेर पडण्याची...

मेडिकलमध्ये टॉप आलेल्या विद्यार्थ्यांना एका मोठ्या हॉस्पिटलमध्ये सिलेक्शनसाठी बोलावण्यात आले. सर्वांना एका हॉलमध्ये बसवून त्यांच्यासमोर शस्त्रक्रियेकरिता लागणारे सर्व साहित्य ठेवण्यात आले आणि त्या साहित्यांपैकी शस्त्रक्रियेकरिता न लागणारे साहित्य झटकन ओळखून दाखवण्यास सांगितले गेले. त्या सर्वांपैकी टॉप आलेला मुलगा पटकन उत्तर देईल, असे सर्वांना वाटले, परंतु त्यांच्यापैकी सर्वांत कमी टक्के मिळवलेल्या मुलाने ती कात्री ओळखून दाखवली जी शस्त्रक्रियेकरिता न वापरता रोजच्या कामासाठी वापरली जाते.

टॉप आलेला विद्यार्थी कात्री ओळखू शकला नाही याला कारणीभूत होते ते त्याचे संकुचित ज्ञान. त्याने केलेला अभ्यास हा परीक्षेपुरता होता. चौकटीच्या बाहेर जाऊन जास्तीत जास्त माहिती, जास्तीत जास्त ज्ञान मिळवण्याचा त्यानी प्रयत्नच केला नाही. याउलट दुसऱ्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले गुण कमी असतील पण त्याने त्या परीक्षेतून, अभ्यासातून अनमोल असे ज्ञान मिळवले, जे त्याला त्याच्या भावी आयुष्यात नक्कीच उपयोगी पडणार आहे. आजचा तरुणवर्ग हा पुस्तकीकिडा बनला आहे. त्यांच्याकडे शैक्षणिक पदव्या तर असतात. मात्र त्यांचे ज्ञान हे चाकोरीतले असते. हे खाली नमूद केलेल्या खऱ्या घडलेल्या घटनेवरून तुम्हाला सहजच समजेल.

अमेरिकेमध्ये एक फार जुने हॉटेल होते. हॉटेल जरी जुने असले तरी त्याचा धंदा मात्र तेजीत होता. म्हणून हॉटेल मालकाने ठरवले की त्या हॉटेलवर नवीन मजले वाढवायचे. तेव्हा त्यांच्यासमोर एक मोठी समस्या उभी राहिली की लिफ्ट बांधायची कुठे! कारण जुन्या पद्धतीचे बांधकाम असल्यामुळे हॉटेलमध्ये लिफ्टसाठी जागाच नव्हती. त्या वेळी त्यांनी मोठमोठ्या इंजिनिअर्सना याबाबत तोडगा काढण्यास सांगितले. कोणी सांगितले की खोल्या तोडाव्या लागतील व त्याजागी लिफ्ट बांधावी लागेल. कोणी सांगितले की इमारत तोडूनच पुन्हा नवीन बांधावी लागेल, परंतु मालकाला



इमारत न तोडता वर मजले बांधायचे होते. कोणीही समाधानकारक तोडगा शोधून काढू शकत नाही. त्याचवेळी, त्या हॉटेलच्या वेटरनी मालकाला सुचविले. आपण लिफ्ट इमारतीच्या बाहेरून बांधली तर!! आहे ना तर्कशुद्ध विचार.

मित्रांनो, जो विचार इंजिनिअर्स करू शकले नाही तो विचार त्या साध्या वेटरला सुचला. इंजिनिअर्सच्या अपयशाला कारणीभूत त्यांचे संकुचित ज्ञान व संकुचित वृत्ती.

तेव्हा मित्रांनो घोकंपट्टी करून फक्त गुण मिळवायच्या पाठी

पडू नका. कारण फक्त गुणच महत्त्वाचे नसतात, तुम्ही अभ्यास करून जे ज्ञान आत्मसात करणार आहात ते मौल्यवान आहे. कारण तेच भावी आयुष्यात तुम्हाला पदोपदी कामी येणार आहे. तुम्ही जे करिअरक्षेत्र निवडणार आहात. त्यात नोकरी मिळण्यापासून ते उच्च पद गाठेपर्यंत प्रत्येक पायरीवर उपयोगी पडणार आहे.

असे असतानाही, बरेचसे विद्यार्थी अर्थ न समजता पाठांतर करत जातात. आश्चर्याची बाब म्हणजे इंग्रजीतील व्याकरणाचेसुद्धा पाठांतर केले जाते यावरून आजचा विद्यार्थी पुस्तकीकिडा बनलेला आहे हे स्पष्ट होते. मित्रांनो, जर व्याकरण हा इंग्रजीचा पाया जर तुम्हाला समजला नाही तर तुम्हाला इंग्रजी लिहायला व बोलायला येणार तरी कसे!

तेव्हा प्रत्येक विषयाची चौकटीच्या बाहेर जाऊन वेगवेगळ्या मार्गांनी जास्तीत जास्त माहिती मिळवण्याचा प्रयत्न करा. जोपर्यंत प्रत्येक मुद्दा, प्रत्येक संकल्पना व्यवस्थित समजत नाही तोपर्यंत पुढे जाऊ नका. अर्धवट माहिती मिळवू नका. "Half knowledge is dangerous" मित्र-मैत्रिणीचे अभ्यासगट बनवा व मित्र-मैत्रिणीबरोबर बसून प्रत्येक विषयातील संकल्पनाविषयी चर्चा करा. तुम्हाला उद्‌भवणाऱ्या समस्येविषयी चर्चा करा. शिक्षकांचे मार्गदर्शन घ्या. वडीलधाऱ्या माणसांची मदत घ्या. की जेणेकरून अभ्यासक्रमातील तुम्हाला उद्‌भवलेल्या प्रत्येक समस्येचे निराकारण होईल आणि घोकंपट्टी न करता, अर्थ नीट समजावून घेऊन प्रत्येक विषयाचा तुम्ही अभ्यास करू शकाल आणि यातूनच मौल्यवान असे ज्ञान तुम्ही आत्मसात करू शकाल.

मित्रांनो तेव्हा निर्णय तुम्हालाच घ्यायचा आहे, तुम्हाला रट्टा मारून घोकंपट्टी करून अभ्यासक्रम संपवायचा आहे, की त्या अभ्यासक्रमातून आयुष्यभर उपयोगी पडणारे ज्ञान जास्तीत जास्त आत्मसात करायचे आहे.